MSBL श्रीमंत मालोजीराजे सहकारी बँक लि.

मुख्य कार्यालय : मुधोजी मनमोहन राजवाडा परिसर, फलटण, जिल्हा सातारा ४१५५२३

५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

(फक्त सभासदांकरिता)

प्रति,

माननीय सभासद बंधू व भगिनींनों,

आपणास कळविण्यात येते की, **श्रीमंत मालोजीराजे सहकारी बँक लि. या बँकेची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २७/०९/२०२६ रोजी सकाळी ११.३० वा.** बँकेच्या मुख्य कार्यालयातील सभागृहामध्ये खालील विषयांवर विचार विनिमय करणेसाठी आयोजित करण्यात आली आहे. सदर सभा बँकेचे विद्यमान अध्यक्ष श्रीमंत संजीवराजे विजयसिंह नाईक निंबाळकर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. तरी आपण या सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

◆ सभे पुढील विषय ◆

विषय क्र.१. मागील दि. २७/०९/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

विषय क्र.२. मा. संचालक मंडळाने सादर केलेला सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा अहवाल व वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक वाचून त्यास स्वीकृती देणे.

विषय क्र.३. मा. वैधानिक लेखापरीक्षक यांचा सन २०२५-२६ चा लेखापरीक्षण अहवाल वाचून त्याची नोंद घेणे व स्वीकृत करणे.

विषय क्र.४. मा. वैधानिक लेखापरीक्षकांच्या सन२०२४-२५ अखेरचा लेखापरिक्षणाचे दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे व तो स्वीकृत करणे.

विषय क्र.५. सन २०२६-२७ सालाचे अंदाजपत्रक संमत करणे व सन २०२५-२६ सालात अंदाजपत्रकापेक्षा ज्या बाबींवर अधिक खर्च झालेला आहे, त्यास मान्यता देणे.

विषय क्र.६. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सहकार खातेचे नामतालिकेवर असणाऱ्या व रिझर्व्ह बँकेने मान्यता दिलेल्या वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

विषय क्र.७. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात झालेल्या नफ्याच्या विनियोगाबाबत निर्णय घेणे.

विषय क्र.८. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात शासनमान्य एकरकमी कर्ज परत फेड योजने अंतर्गत व्याज सवलत देऊन बंद केलेल्या कर्ज खात्यांची माहिती घेणे व त्यास कार्योत्तर मान्यता देणे.

विषय क्र.९. बँकेच्या संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

विषय क्र.१०. मा.वैधानिक लेखापरिक्षकांनी सूचीत केलेल्या शाखा-मुख्यालय ताळमेळ पत्रकातील दिर्घकालीन प्रलंबीत रकमा निर्लेखीत करणे तसेच बँकर्स ताळमेळ पत्रकातील दिर्घकालीन प्रलंबीत रकमा रिझर्व्ह फंडात वर्ग करणेस मान्यता देणे.

विषय क्र.११. ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत करणे.

विषय क्र.१२. मा. अध्यक्षांचे अनुज्ञेने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

स्थळ - फलटण
दिनांक : ०८.०९.२०२६

राजेश लढ्ढा
मुख्य कार्यकारी अधिकारी
माननीय संचालक मंडळाच्या आदेशानुसार,

◆ सूचना ◆

१) गणपूर्ती (कोरम) अभावी सभा तहकूब झाल्यास सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल.

२) दि. ३१ मार्च २०२६ अखेर बँकेचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व वार्षिक अहवालाची संपूर्ण माहिती मुख्यालयासह सर्व शाखांच्या नोटीस बोर्डवर व वर्तमानपत्रात तसेच बँकेची वेबसाईट www.malojiraje.bank.in वर सभासदांच्या माहितीसाठी प्रसिध्द केली आहे.

३) ज्या सभासदांना सभेच्या विषयांबाबत प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि.१६/०९/२०२६ ते दि.२४/०९/२०२६ या कालावधीत शाखा व मुख्य कार्यालयाचे कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात प्रश्न द्यावेत. अथवा ho@malojiraje.bank.in या मेलवर उपरोक्त कालावधीत,सभासद क्रमांक व संपूर्ण नांव नमूद करुन पाठवावेत. सभेच्या विषय-पत्रिकेतील विषयांबाबतचे प्रश्न विचारात घेतले जातील.

४) वार्षिक सर्वसाधारण सभा संपलेनंतर सभास्थानी सभासदांकरिता सायबर सिक्युरिटी जागृकता (Cyber Security Awareners) वर प्रशिक्षण आयोजित केलेले आहे. तरी सदर प्रशिक्षणाचा सभासदांनी लाभ घ्यावा ही विनंती.

◆ विशेष सूचना ◆

१) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सूचने नुसार, सर्व सभासदांनी व खातेदारांनी त्यांची अद्ययावत के.वाय.सी. (KYC) बाबतच्या कागदपत्रांची सर्वोतोपरी पूर्तता करणे आवश्यक आहे. अद्ययावत के.वाय.सी.ची पूर्तता केली नसल्यास आपल्या नजिकच्या शाखेत संपर्क साधावा ही विनंती.

२) सभासदांनी त्यांचे भाग-भांडवल रकमेस वारस नोंद केली नसल्यास त्याबाबतची पूर्तता करावी

३) सर्व सभासदांनी व खातेदारांनी त्यांचा सध्याचा पत्ता व सध्याचा मोबाईल नंबर व ईमेल आयडी नजिकच्या शाखेत संपर्क साधून अद्ययावत करुन घेणे त्यामुळे बँकेस आपणाशी संपर्क करणे सुलभ होईल. तसेच सध्या एका भागाची (शेअर्स) किंमत रु. १०००/- असून ज्या सभासदांचे अपूर्ण शेअर्स आहेत त्यांनी आपले शेअर्स पूर्ण करावेत.

४) ज्या ठेव खात्यावर मागील १० वर्षे व्यवहार झाले नाहीत अथवा मुदत संपून १० वर्षापेक्षा जादा कालावधी झालेला आहे अशा सर्व खात्यावरील रक्कम रिझर्व्ह बँकेकडे (DEAF खाती) वर्ग करावी लागते. तरी बँकेतील सर्व ठेव खातेदारांनी आपले खातेवर किमान ६ महिन्यातून एकदा व्यवहार करुन खाते नियमित करुन घ्यावे. DEAF खाते वर्ग झालेल्या खात्यांची यादी नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली असून सदर खातेस नवीन केवायसी देऊन खाते व्यवहार करुन खाते नियमित करुन घेतले नंतर सदर खात्यावरील रिझर्व्ह बँकेकडे वर्ग झालेली रक्कम परत मिळवता येईल.

५) सर्व लॉकर धारकांनी आपले लॉकर नियमित ऑपरेट करावे.

६) वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेला अहवाल सालातील ताळेबंद व नफा-तोटा पत्रक दि.२८ जून २०२६ च्या ''दैनिक सांजवार्ता'' वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेला आहे.

७) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सर्व खातेदारांनी आपले बँकेतील खातेस नामनिर्देशित व्यक्तींची नेमणूक करावी.

८) बँकेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सर्व सभासदांनी आपले सर्व व्यवहार श्रीमंत मालोजीराजे सहकारी बँकेतूनच करावेत तसेच आपले नातेवाईक, मित्र, यांचे खाते आपले बँकेत खाते उघडण्यासाठी आग्रह धरावा.

९) आपण कर्जदार असाल तर आपली कर्जफेड वेळेवर व मुदतीत करा, ज्या कारणासाठी कर्जे घेतले असेल त्यासाठी त्याचा विनियोग करा.

१०) नवीन ए.टी.एम.कार्ड साठी आपली मागणी करा.

११) कोणत्याही अनोळखी व्यक्तीला बँकेत खाते उघडण्यासाठी ओळख देऊ नका.

१२) बँकेच्या सर्व सभासद व खातेदारांना मोबाईल बँकिंग सुविधा उपलब्ध करुन दिलेली असून सदर ॲप गुगल प्लेस्टोअर वरती उपलब्ध आहे. मोबाईल बँकिंग सुविधेचा लाभ घेण्याकरिता नजीकच्या शाखेशी संपर्क साधावा.

१३) आपल्या बहुमोल सूचना व तक्रारी लेखी स्वरुपात सूचना पेटीत/बँकेकडे द्याव्यात.

१४) बँकेच्या सर्व सभासद व खातेदारांनी मोबाईल बँकिंग सुविधेचा लाभ घेण्याकरिता आपले जुने मोबाईल नंबर बदलले असल्यास नवीन मोबाईल नंबर अपडेट करुन घ्यावेत.